# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

(अधिकार प्रदत्त स्वादत्त)

## ग्रंथालय विभाग

**साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शन.**

दिनांक :- 1/8/2026

वार :- शनिवार

स्थळ :- ग्रंथालय

वेळ :- सकाळी 10:30 वाजता

प्रमुख पाहुणे :- श्री कैलास ज्ञानेश्वर भालेकर.

अध्यक्ष :-मा. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे.

प्राचार्य, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

Vivekanand College, Kolhapur
ESTD JUNE 1964

दि. 31/7/26

प्रति,
मा. प्राचार्य
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

विषय :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त ग्रंथालयाच्या वतीने अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या यांचे वाचन कार्यक्रम आयोजनाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती करते की, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे परिपत्रकानुसार साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे जयंतीनिमित्त उद्या दि. 1 ऑगस्ट 2026 रोजी अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णन यांचे विद्यार्थ्यांकडून वाचन करून घेण्यास परवानगी मिळावी ही विनंती

1.8.26

परवानगी आहे

कळावे,
आ. विश्वासू

ग्रंथपाल
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

Vivekanand College, Kolhapur (Autonomous Institute)
ESTD JUNE 1964

68
CET 64

1928

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

9325090434

# विद्यार्थी विकास विभाग

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/४९६ दि. ३१/०७/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मदिवस ०१ ऑगस्ट हा लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण—१०२६/प्र.क्र.७६/समन्वय नुसार प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचा ०१ ऑगस्ट हा जन्मदिवस उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व विद्यापीठ/महाविद्यालये/संस्थामध्ये लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयामध्ये खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१. विद्यार्थ्यांना विविध विषय देवून विद्यार्थ्यांकरिता कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धाचे आयोजन करणे.
२. विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.
३. स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती, व्याख्याने आयोजित करणे.
४. ग्रंथ दिंडी आयोजित करुन ग्रंथलेखनाचे महत्व पटवून देणे.
५. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या, प्रवास वर्णन, लोकनाटय तसेच शाहिरीचे विद्यार्थ्यांनी वाचन करणे.
६. अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तित्व आणि साहित्यिक कर्तृत्वावर व्याख्यानांचे आयोजन करणे.
७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा तसेच साहित्य संमेलनांचे आयोजन करणे.

तरी आपल्या महाविद्यालयात लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करुन उपक्रम राबविण्यात यावा हि विनंती.

कळावे,

डॉ. नपारने / डॉ. निना पाटील
31.7.26
31/7/26

आपला विश्वासू
(सही)
संचालक
विद्यार्थी विकास

D:\E\Pika\letter.docx

Vivekanand College, Kolhapur
ESTD
JUNE
1964

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/ अण्णा भाऊ साठे १ ऑ जन्म दिवस सा /परिपत्रक/मवि-१/२०२६/ई- ३०१६२३८ दि. /७/ २०२६

# परिपत्रक

विषय : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिन (दि. ०१ ऑगस्ट) "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

वाचा : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- १०२६/प्र.क्र.७६/समन्वय, दिनांक २९ जुलै २०२६.

उपरोक्त विषयी संदर्भांकित वाचा येथील शासन परिपत्रकान्वये, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने मराठी साहित्य विश्वात अमूल्य आणि भरीव असे योगदान दिले आहे. आपल्या लेखणीच्या जोरावर अण्णा भाऊ साठे हे साता समुद्रापार एक झुझांर लेखक म्हणून पोहचले, अशा जागतिक कीर्तीचे प्रतिभांवत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून दिनांक ०१ ऑगस्ट, हा त्यांचा जन्म दिवस "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यानुषंगाने प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा ०१ ऑगस्ट हा जन्मदिवस उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१. विद्यार्थ्यांना विविध विषय देवून विद्यार्थ्यांकरिता कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धाचे आयोजन करणे.
२. विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.
३. स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती, व्याख्याने आयोजित करणे.
४. ग्रंथ दिंडी आयोजित करुन ग्रंथलेखनाचे महत्व पटवून देणे.
५. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या, प्रवास वर्णन, लोकनाट्य तसेच शाहिरीचे विद्यार्थ्यांनी वाचन करणे.
६. अण्णा भाऊ साठे यांच्या व्यकितत्व आणि साहित्यिक कर्तृत्वावर व्याख्यानांचे आयोजन करणे.

७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा तसेच साहित्य संमेलनांचे आयोजन करणे.

याअनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था /राज्य सार्वजनिक विद्यापीठांना वाचा येथील शासन परिपत्रकातील सूचनांनुसार "लेखन प्रेरणा दिन" उत्साहात व प्रभावीपणे साजरा करण्याबाबत आवश्यक त्या सूचना तात्काळ देण्यात याव्यात.

तसेच सदर उपक्रमास व्यापक प्रसिद्धीकरण करून विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. व आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाचा अहवाल छायाचित्रांसह माहिती संचालनालयास सादर करावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 30-07-2026 18:00:58

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

प्रत - माहितीस्तव सादर

1. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव
2. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिवस ०१ ऑगस्ट हा "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण- १०२६/प्र.क्र.७६/समन्वय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २९ जुलै, २०२६

**प्रस्तावना -:**

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने मराठी साहित्य विश्वात अमूल्य आणि भरीव असे योगदान दिले आहे. आपल्या लेखणीच्या जोरावर अण्णा भाऊ साठे हे साता समुद्रापार एक झुंझार लेखक म्हणून स्वप्रतिभेच्या बळावर पोहचले, अशा जागतिक कीर्तीचे प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून ०१ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जावा असे महाराष्ट्रातील अण्णा भाऊंच्या साहित्यावर प्रेम करणा-या वाचकांना वाटते. मराठी मनाला अण्णा भाऊ साठे या प्रतिभावंत लेखकाच्या जयंतीच्या निमित्ताने आपणही लेखन करुन आपली प्रतिभा मराठी साहित्यात उमटविली पाहिजे, ही प्रेरणा मिळावी आणि समाजातील सर्वच स्तरातील प्रतिभावंत या निमित्ताने लिहिते व्हावेत ही या मागची भूमिका आहे. त्यानुषंगाने ०१ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व विद्यापीठे/महाविद्यालये/संस्थांमध्ये 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याबाबतचे निदेश देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन परिपत्रक :**

प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचा ०१ ऑगस्ट हा जन्मदिवस उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व विद्यापीठे/महाविद्यालये/संस्थांमध्ये 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने वरील शैक्षणिक संस्थांमध्ये खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

(१) विद्यार्थ्यांना विविध विषय देवून विद्यार्थ्यांकरिता कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धाचे आयोजन करणे.

(२) विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.

(३) स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती, व्याख्याने आयोजित करणे.

(४) ग्रंथ दिंडी आयोजित करुन ग्रंथलेखनाचे महत्व पटवून देणे.

(५) अण्णा भाऊंच्या कथा, कादंब-या, प्रवास वर्णन, लोकनाट्य तसेच शाहिरीचे विद्यार्थ्यांनी वाचन करणे.

(६) अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तित्व आणि साहित्यिक कर्तृत्वावर व्याख्यानांचे आयोजन करणे.

(७) अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा तसेच साहित्य संमेलनांचे आयोजन करणे.

३. याकरीता संचालक (उच्च शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण) संचालक (कला) यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठे/महाविद्यालये/संस्था यांना १ ऑगस्ट हा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याबाबत सूचित करावे.

४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०७२९१६२९३७२००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE766515620R3F8B, cn=A S MUTYAL
Date: 2026.07.29 16:30:28 +05'30'

(अ.शा. मुत्याल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री ( नगर विकास ) यांचे प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.उप मुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क ) यांचे प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण/ कला/ ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) सर्व सह सचिव / सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कुलसचिव, सर्व सार्वजनिक/अभिमत/खाजगी/समूह विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.
१०) निवडनस्ती (आस्था-२)

## लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून मांडल्या वंचित समाजाच्या व्यथा

- प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**विवेकानंद कॉलेजमध्ये अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त ग्रंथप्रदर्शन.**

कोल्हापूर दि.1 : लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोकशाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित, कष्टकरी व कामगार वर्गाचे जीवन प्रभावीपणे मांडले. अण्णा भाऊ यानी लेखन केलेल्या वारणेचा वाघ या पुस्तकातील सत्तू धर्माचा भाऊराया या ग्रामीण लोकसंगीताच्या ढंगात रचलेल्या गीताविषयी माहिती देऊन अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य् वाचून सामाजिक, समता, मानवता आणि स्वाभिमानाची मूल्ये आत्मसात करा असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी विद्यार्थ्यांना केले. ते येथील ग्रंथालयात अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी इतिहास विषयाचे विभागप्रमुख डॉ. अजय पाटील यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची सामाजिक परिवर्तनातील भूमिका तसेच लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रवादी विचारांचे महत्व स्पष्ट केले. या प्रदर्शनात अण्णा भाऊ साठे यांच्या फकिरा, वैजयंता, चित्रा, माकडीचा माळ यासह विविध साहित्यकृतींचे ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन ग्रंथालय व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा व विविध कार्यक्रम आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून व अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले तर आभार सहाय्यक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अस्मिता तपासे यांनी केले.

याप्रसंगी डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा.एच.व्ही.चामे, डॉ संदीप पाटील, डॉ. गोरख गायकवाड, श्री.बी.ए.नारे, सौ विजया राजेमाने, सौ प्रियांका बिडकर, श्री बी एस खोत, मंगल गुरव, प्रतिक पानारी उपस्थित होते.

### विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

जा.क्र.व्हीसीके/ मेलव्दारे/-2026-27 दि. 01.08.2026

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक -------------- कोल्हापूर
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे

Vivekanand College, Kolhapur ESTD JUNE 1964

## लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून मांडल्या वंचित समाजाच्या व्यथा

- प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**विवेकानंद कॉलेजमध्ये अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त ग्रंथप्रदर्शन.**

कोल्हापूर दि.1 : लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोकशाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित, कष्टकरी व कामगार वर्गाचे जीवन प्रभावीपणे मांडले. अण्णा भाऊ यानी लेखन केलेल्या वारणेचा वाघ या पुस्तकातील सत्तू धर्माचा भाऊराया या ग्रामीण लोकसंगीताच्या ढंगात रचलेल्या गीताविषयी माहिती देऊन अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य् वाचून सामाजिक, समता, मानवता आणि स्वाभिमानाची मूल्ये आत्मसात करा असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी विद्यार्थ्यांना केले. ते येथील ग्रंथालयात अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी इतिहास विषयाचे विभागप्रमुख डॉ. अजय पाटील यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची सामाजिक परिवर्तनातील भूमिका तसेच लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रवादी विचारांचे महत्व स्पष्ट केले. या प्रदर्शनात अण्णा भाऊ साठे यांच्या फकिरा, वैजयंता, चित्रा, माकडीचा माळ यासह विविध साहित्यकृतींचे ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन ग्रंथालय व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा व विविध कार्यक्रम आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून व अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले तर आभार सहाय्यक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अस्मिता तपासे यांनी केले.

याप्रसंगी डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा.एच.व्ही.चामे, डॉ संदीप पाटील, डॉ. गोरख गायकवाड, श्री.बी.ए.नारे, सौ विजया राजेमाने, सौ प्रियांका बिडकर, श्री बी एस खोत, मंगल गुरव, प्रतिक पानारी उपस्थित होते.

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

जा.क्र.व्हीसीके/ मेलव्दारे/-2026-27 दि. 01.08.2026

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक -------------- कोल्हापूर
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे

Vivekanand College, Kolhapur ESTD JUNE 1964

# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

दि : 1/8/2026

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे जयंतीनिमित्त वाचन लेखन कार्यक्रम.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पुस्तकांचे नाव | सही |
|---|---|---|---|
| 1 | अर्पिता अमित कांबळे | जिवंत काडतूस | AKamble |
| 2 | आदिती गौतम माने | मयूरा अण्णाभाऊ साठे | Amane |
| 3 | ज्ञानेश्वरी अनिल गावडे | केवड्याचं कणीस | [illegible] |
| 4 | श्रावस्ती सचिन धनवडे | राम - रावण युद्ध | Dhanawade |
| 5 | समृद्धी बाळासाहेब कोळी | कुरूप | SBKoli |
| 6 | पानारी प्रतिक प्रकाश | संघर्ष | पानारी |
| 7 | आनुष्का बाबासाहेब आंबेकर | अहंकार | A.B. Ambekar |
| 8 | संतोष बंडू देवणे | मूर्ती | SB Devane |
| 9 | स्वालिहा सलिम शेख | नवती | Swaliha |
| 10 | अथर्व अनिल पाटील | आग | [illegible] |
| 11 | सोहेब पापाभाई पखाली | कृष्णाकाठच्या कथा | Pakhali |
| 12 | शोएब सय्यद | खुळंवाडी | [illegible] |
| 13 | बागवान आफरीन मोहसीन | गुऱ्हाळ | ABagwan. |
| 14 | गोलंदाज सायमा आसिफ | चंदन | Sayma |
| 15 | श्रेया सतिश दळवी | केवड्याचं कणीस | Dalavi. |
| 16 | प्रणया नारायण देसाई | जिवंत काडतूस | Pranaya. |
| 17 | श्रेया आंगचेकर | संघर्ष | SHREYA... |
| 18 | बचाटे समिक्षा अजित | नवती | SAB |
| 19 | बोराटे तनिष्का युवराज | अहंकार | Tanishkka |
| 20 | श्रीयश युवराज फाळके | कुरूप | Sphalke. |
| 21 | यश भास्कर तारे | राम - रावण युद्ध | Yash |
| 22 | शितल आण्णासो पाटील | मयूरा अण्णाभाऊ साठे | SheetalPatil |

Vivekanand College, Kolhapur ESTD JUNE

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | किरण विनोद जांभळे | चिखलातील कमळ | [signature] |
| 24 | सिया निवास साठे. | गुऱ्हाळ | S.sathe |
| 25 | संगीता बाबुराव देवणे | केवड्याचं कणिस | Devane. |
| 26 | समिक्षा अशोक बामणीकर | गुलाम | [signature] |
| 27 | राजनंदिनी नेताजी पाटील. | चंदन | Patil |
| 28 | ओम संतोष खडे | आवडी | [signature] |
| 29 | श्रावणी बाजीराव मुळीक | रामरावण युद्ध | [signature] |
| 30 | गौरी महादेव पलंगे | अहंकार | GM Palange |
| 31 | स्नेहल कृष्णात नलवडे. | मूर्ती | [signature] |
| 32 | गोरक्षा अनिल पाटिल | आग | [signature] |
| 33 | अथर्व विजय पाटील | कुरूप | [signature] |
| 34 | साईराज सदाशिव सुतार | संघर्ष | [signature] |
| 35 | आदिती एकनाथ पाटील | नवती | आदिती पाटील |
| 36 | प्रज्वल प्रमोद जगडे | मयुरा आण्णाभाऊ साठे | [signature] |
| 37 | Atharva Amit Sutar | जिवंत काडतुस | A.A.Sutar. |
| 38 | श्रेयश प्रविण खोचरे. | धुंद | [signature] |
| 39 | Yash P. Patil | तारा | Patil |
| 40 | ज्ञानेश्वरी रमेश पोवार | फकिरा | Powar. |
| 41 | जान्हवी गणेश पाटील | फकिरा | JNPatil |
| 42 | दिपावली महेश कुरणे | निखारा | [signature] |
| 43 | शरयु अमृत कांबळे | फुलपाखरू | Kamble |
| 44 | मानसी महेश कांबळे. | नवती | M.M.K |
| 45 | त्रिशा महादेव पिंगळे | फकिरा | T.M.Pingale |
| 46 | मृदुला विशाल चव्हाण | डासलेल्या बंदुका | [signature] |
| 47 | श्रावणी तुकाराम गावडे | मास्तर | [signature] |
| 48 | प्रतिक्षा राजकुमार सनदी | रत्ना | Sanadi |
| 49 | सृष्टी अजित जाधव | रूपा | Srushti |
| 50 | गोपाल रामकुमार साहू | फकिरा | [signature] |
| 51 | राजनंदिनी संतोष शेळके | कुरूप | R.Shelake |
| 52 | पूजा रविंद्र शेवाळे | गुलाम | Shewale |
| 53 | पूर्वा संभाजी कुंडले | चंदन | [signature] |

Vivekanand College, Kolhapur
ESTD
JUNE

| | अभिप्राय | नाव | वर्ग | सही |
|---|---|---|---|---|
| 1) | अनुप ज्ञान पुस्तकांचा संग्रह केलेला आहे. हा उपक्रम अतिशय छान पद्धतीचा झाला आहे. | चोमे. एच. व्हि | | [signature] |
| 2) | लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी ग्रंथालयाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी दोघांच्या पुस्तकांचे प्रदर्शनही भरवण्यात आले. विद्यार्थ्यांपर्यंत त्यांचे विचार व ग्रंथसंपदा पोचवण्याचा विचार अत्यंत स्तुत्य आहे | डॉ. संदीप पाटील | | [signature] |
| 3 | अतिशय सुंदर पुस्तकांचा संग्रह वाचन करण्यासाठी उपलब्ध आहे. | डॉ. गायकवाड जी.बी. | | [signature] |
| 4. | अतिशय स्तुत्यपूर्ण असा उपक्रम आज विविध स्पर्धा परीक्षा व कार्यक्रम समिती व लायब्ररी यांच्या संयुक्त विद्यमानाने साजरी करण्यात आली. यावेळी लोकशाहीर समाजसुधारक आण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्याच्या निमित्ताने त्यांचे विचार व | डॉ. अस्मिता श. तपासे | | Tapase |


Vivekanand College, Kolhapur ESTD JUNE 1964


















Vivekanand College, Kolhapur
ESTD JUNE